# Incubation

# Centre

2020 ------Onwards

Page No.
Date

# सभा क्र. १.

आज दिनांक ०२/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता 'महिला सेल' व 'उत्कर्षा' यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात महिला बचत गटांचे 'Incubation Centre' स्थापन करण्यासंबंधी चर्चा करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले. सभा प्राचार्यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली. सभेला खालील सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. यशवंत पाटील (प्राचार्य) [signature] 2/12/2020
२. डॉ. प्रज्ञा बागडे (समन्वयक, महिला सेल) [signature]
३. डॉ. मनिषा नागपुरे - [signature]
४. डॉ. विमल राठोड - [signature]
५. प्रा. अमृता डोरलीकर A. I. Dorlikar
६. प्रा. प्रणोली डांबळे [signature]
७. डॉ. मेघा रामटेके [signature]
८. डॉ. सुदेश भोवते [signature]

## सभेचे विषय

१. महाविद्यालयात महिला बचत गटांसाठी 'Incubation' सेंटर स्थापन करण्यासंबंधी चर्चा करणे व निर्णय घेणे.

## सभेचे इतिवृत्त

१. 'महिला सेल' व 'उत्कर्षा' च्या समन्वयक डॉ. प्रज्ञा बागडे यांनी 'Incubation Centre' ची संकल्पना मांडली. नॅक महाविद्यालयांकडून अपेक्षा करते की, समाजातील विविध कमजोर घटकांच्या उत्थानासाठी महाविद्यालय कार्य करते ? या दृष्टीकोनातून महाविद्यालयातील महिला सेल व उत्कर्षाच्या वतीने अनौपचारीक चर्चा होवून त्यात असे ठरल्याचे सांगितले की, महाविद्यालयातील 'महिला सेल' ग्रामीण भागातील महिलांच्या उत्था-

५३ 'Incubation Centre' 'उष्मायन केंद्र' स्थापन करू शकतो. त्या दृष्टीने चर्चा करण्यात यावी व प्राचार्यांच्या परवानगीने स्थापन करावे.

२. यासंबंधी चर्चा होवून डॉ. प्रज्ञा बागडे यांनी सभेला सांगितले की महाविद्यालयातील हे 'Incubation Centre' ग्रामीण भागातील महिला बचतगटांसाठी, त्यांच्या विकासासाठी, त्यांनी तयार केलेल्या मालाचा दर्जा सुधारण्यासाठी, त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी, त्यांना प्रशिक्षणपर कार्यशाळा आयोजित करण्यासाठी, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, त्यांच्या उत्पादन ठिकाणाला भेटी देण्यासाठी काम करेल.

3. प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांनी डॉ. प्रज्ञा बागडे यांच्यावर जबाबदारी सोपवून एक समिति स्थापन करण्याची सूचना केली. तसेच जीथे-जीथे असे उष्मायन केंद्र आहेत तिथे भेट देवून त्यांच्याशी चर्चा करून त्यांची कार्यपद्धती समजून घेण्याची सूचना केली.

४. पुढील सभेत समितीचे गठन करून समितीची नावे सभेत ठेवण्याची सूचना दिली.

५. डॉ. प्रज्ञा बागडे यांनी या संदर्भात नागपूर जिल्ह्याच्या म. बचत गटाच्या संचालिका श्रीमती संगीता चव्हाण यांच्याशी संपर्क करण्यात येईल असे सांगितले.

६. डॉ. अमृता डोरलीकर यांनी सभेचे आभार मानले व सभा संपविण्यात आली.

सभा सचिव

# सभा क्र. २.

आज दिनांक ०४/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयातील 'महिला सेल' व 'उत्कर्ष' यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात महिला बचत गटांसाठी 'Incubation Centre' स्थापनेसंबंधी चर्चा करण्यासाठी सभेचे आयोजन प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. सभेला खालील प्राध्यापक उपस्थित होते.

१. डॉ. यशवंत पाटील (प्राचार्य) ४/१२/२०२०
२. डॉ. प्रज्ञा पाटील (समन्वयक)
३. डॉ. मनिषा नागपूरे -
४. डॉ. विमल राठोड -
५. डॉ. सुदेश भोवते
६. डॉ. सुशांत चिमणकर -
७. प्रा. अमृता डोरलीकर - A.I. Dorlikar
८. प्रा. प्रणोती कांबळे
९. डॉ. मेधा रामटेके

## सभेचे विषय

१. महाविद्यालयात महिला बचतगटांसाठी 'Incubation Centre' (उबायण केंद्र) स्थापनेसंबंधी चर्चा करणे व निर्णय घेणे.

## सभेचे इतिवृत्त

१. 'महिला सेल' व 'उत्कर्ष' यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'Incubation Centre' स्थापन करण्यासंबंधीच्या मागील सभेत ठरल्याप्रमाणे व प्राचार्यांच्या सूचने-प्रमाणे खालील सदस्यांना घेऊन एक समिती स्थापन करण्यात आली. ती खालील प्रमाणे -

१. डॉ. प्रज्ञा बागडे (समन्वयक)
२. डॉ. मनिषा नागपूरे (सदस्य) -

६. प्रा. प्रणोती डोंबळे (सदस्य)
७. डॉ. सुशांत चिमणकर (सदस्य)
८. डॉ. चंद्रशेखर पाटील (सदस्य)
९. डॉ. मेधा रामटेके (सदस्य)

२. डॉ. प्रज्ञा बागडे यांनी सभेला सांगितले की, नागपूर जिल्ह्याच्या महिला बचत गटाच्या संचालिका श्रीमती संगीता चव्हाण यांच्याशी संपर्क केला असता त्यांच्याशी चर्चा करून असे ठरले की, संगीता चव्हाण यांच्या "दृष्टी बहुउद्देशीय संस्था" (N.G.O.) शी एक सामंजस्य करार "(MOU) करण्यात यावा जेणेकरून हा उपक्रम महाविद्यालयात राबविता येईल. प्राचार्यांनी प्रस्ताव ऐकून घेवून चर्चा करून प्रस्तावाला मान्यता दिली.

३. पुढील आठवड्यात श्रीमती संगीता चव्हाण यांच्याशी एक सभा आयोजित करून पुढील कार्यवाहीला सुरवात करावी तसेच सर्व सदस्यांना समीती सदस्यत्वाचे पत्र देण्यात यावे अशी सूचना प्राचार्यांनी केली.

४. सभेचे आभार डॉ. प्रणोती डोंबळे यांनी मानले व सभा समाप्त करण्यात आली.

डॉ. प्रज्ञा बागडे
समन्वयक

# सभा क्र. 3

आज दिनांक 23/12/2020 ला सकाळी 11.30 वाजता महाविद्यालयातील नव्याने स्थापन झालेल्या 'Incubation Centre', 'महिला सेल' व उत्कर्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'Incubation Centre' च्या कामकाजा विषयी चर्चा करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले. सभा प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला खालील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ. यशवंत पाटील (प्राचार्य) [signature] 23/12/2020
2. डॉ. प्रज्ञा बागडे (समन्वयक)
3. डॉ. मनिषा नागपूरे (सदस्य) - [signature]
4. डॉ. विमल राठोड (सदस्य) - [signature]
5. डॉ. सुदेश भोवते (सदस्य) [signature]
6. डॉ. सुशांत चिमणकर (सदस्य) - [signature]
7. प्रा. अमृता डोरलीकर (सदस्य) - A. I. Dorlikar
8. प्रा. प्रणाली कांबळे (सदस्य) [signature]
9. डॉ. चंद्रशेखर पाटील (सदस्य) [signature]
10. श्रीमती संगीता चव्हाण संचालिका, महिला बचत गट [signature]
11. डॉ. मेघा रामटेके (सदस्य) [signature]

## सभेचे विषय:

1. महाविद्यालयात स्थापन झालेल्या 'Incubation Centre' च्या कामकाजाविषयी चर्चा करणे व निर्णय घेणे.

## सभेचे इतिवृत्त

1. मागील सभेत ठरल्याप्रमाणे 'दृष्टी बहुउद्देशीय संस्थेसोबत सामंजस्य करार (MoU) करण्यात आल्याची माहिती समन्वयिका डॉ. प्रज्ञा बागडे यांनी सभेला दिली. त्याअनुसार या सभेला श्रीमती संगीता चव्हाण यांना आमंत्रित करण्यात आले.

आपल्याला संयुक्तपणे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून ग्रामीण भागातील महिला बचत गटांना सक्षम बनविणे हा मुख्य उद्देश असेल. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थीनींना उद्योजक बनविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन, प्रोत्साहन व प्रशिक्षण यासाठी प्रयत्न करणे. या अंतर्गत —

१. महिला बचत गटांच्या कार्यालयीन समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.
२. ग्रामीण भागातील महिला बचत गटांना भेटी देणे व मार्गदर्शन करणे.
३. महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळावे आयोजित करणे.
४. महिलांसाठी प्रशिक्षणपर कार्यशाळेचे आयोजन करणे.
५. महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंच्या दर्जा सुधारण्यासाठी मार्गदर्शन करणे.
६. महिला बचत गटांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न व मार्गदर्शन करणे.
७. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी उद्योजक म्हणून करीयर बनविण्यासाठी मार्गदर्शनपर व्याख्याने व विविध वस्तू तयार करणाऱ्या कार्यशाळेचे आयोजन करणे.

③ महाविद्यालयातील 'Incubation Centre' अंतर्गत वरील ठरल्याप्रमाणे कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येईल असे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, Incubation Centre ची समीती व दृष्टी बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा व म.बचत गटाच्या संचालिका श्रीमती संगीता चव्हाण यांच्यात झालेल्या चर्चेत निर्णय घेण्यात आले.

४. प्राचार्यांनी सभेला काम करण्यासाठी प्रोत्साहन व आदेश दिला यानंतर डॉ. चंद्रशेखर पाटिल यांनी सभेचे

# सभा क्र. ४

आज दिनांक ०९/०१/२०२१ ला सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयातील 'Incubation Centre' 'महिला सेल' व 'उत्कर्षा' यांच्या संयुक्त विद्यमाने बचत गटातील महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी सभेचे आयोजन संदर्भात महाविद्यालयीन स्तरावर सभेचे आयोजन करण्यात आले सभेला खालील सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. प्रज्ञा बागडे (समन्वयक)
२. डॉ. विमल राठोड (सदस्य)
३. डॉ. प्रणोती सहारे (सदस्य)
४. डॉ. सुदेश भोवते (सदस्य)
५. डॉ. अमृता डोरलीकर (सदस्य) A. I. Dorlikar
६. डॉ. सुशांत चिमणकर (सदस्य)
७. डॉ. कमलाकर नागडे (सदस्य)
८. श्रीमती सुनिता मेश्राम (सरपंच, टेकाडी)
९. डॉ. मेघा रामटेके (सदस्य)
१०. डॉ. चंद्रशेखर पाटील (सदस्य)

## सभेचे विषय

१. कन्हान जवळील टेकाडी गावातील महिला बचत गटातील महिलांना मार्गदर्शन करण्यासंदर्भात सभेचे आयोजनपर चर्चा करणे.

२. आयोजनासंबंधी प्राचार्यांची परवानगी घेणे व सभेसंबंधी माहिती देणे.

## सभेचे ठराव

१. महाविद्यालयातील 'Incubation Centre' 'महिला सेल' व उत्कर्षा अंतर्गत बचत गटातील महिलांना मार्गदर्शन

२. महिला बचत गटांना मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय बौद्ध परिषदेचे कोषाध्यक्ष मा. संजय पाटिल, प्रा. शशीकांत राऊत यांना निमंत्रीत करण्याचे सर्वानुमते ठरले.

3. श्रीमती सुनिता मेश्राम, सरपंच टेकडी यांनी सभेला सुचविले की, मा. जाधव व मा. बोरकर जे महिला बचत गटांना प्रत्यक्षपणे मदत करतात म्हणून त्यांना सुद्धा आमंत्रित करायचे असे सर्वानुमते ठरले.

४. या वरील सर्व मान्यवरांचे आमंत्रण पत्र डॉ. प्रज्ञा बागडे या तयार करतील व त्यांना पाठवतील असे ठरले.

५. श्रीमती सुनिता मेश्राम यांनी सांगितले की जवळपास ३० ते ४० महिला बचत गटांच्या प्रतिनिधी सभेला उपस्थित राहतील.

६. सभेची तयारी करण्याची जबाबदारी टेकडीच्या सरपंच श्रीमती सुनिता मेश्राम यांनी स्वीकारली. चहा व नाश्ता सुद्धा देण्यात येईल असे सांगितले.

(signature)
डॉ. प्रज्ञा बागडे
(समन्वयक)

# सभा क्र. ५.

आज दिनांक २०/०१/२०२१ ला सकाळी १०.०० वाजता डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे महिला बचत गटातील महिलांना उद्योग क्षेत्रात येण्यासाठी, अस्तीत्वात असलेल्या उद्योगांना बाजार मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत टेंभडी येथे (ता. पारशिवनी) सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेला अध्यक्ष मा. सुनिताताई मेश्राम ह्या राहतील. तसेच प्रमुख पाहुणे मा. जाधव, मा. बोरकर साहेब राहतील. या सभेला प्रमुख मार्गदर्शक आयु. संजय पाटिल, कोषाध्यक्ष, भारतीय बौध्द परिषद हे राहतील. सभेला ग्रामपंचायत सदस्य व बचतगटाच्या महिला उपस्थित राहतील.

सभेला खालील सदस्य उपस्थित होते.

१. आयु. सुनिताताई मेश्राम - सरपंच
२. आयु. जाधव -
३. आयु. बोरकर -
४. आयु. संजय पाटिल
५. प्रा. शशिकांत राऊत
६. डॉ. प्रज्ञा बागडे
७. डॉ. विमल राठोड
८. डॉ. कमलाकर लागडे
९. डॉ. सुशांत चिमणकर -
१०. आयु. महेश पाटिल
११.

उत्पादनाच्या दर्जावर लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले जरच तुमच्या मालाला मागणी राहील. सभेचे आभार प्रदर्शन

१२. सौ. सिंधु लक्ष्मण सातपैसे (ग्रा. सदस्य) [signature]
१३. संगीता भोयर — संगीता भोयर
१४. प्रिया नरेन्द्र वासाडे — प्रिया नरेन्द्र वासाडे
१५. काजल सूर्यकांत हुड — काजल हुड
१६. शितल ज्ञानेश्वर सातपुते — [signature]
१७. रिना अविनाश चिंचुलकर (CRP) — [signature] (CRP)
१८. स्वाती विलास सावरकर (कृषी सखी) [signature]
१९. शुभांगी मनोज लेकुरवाळे (ग्रामसंघ सचिव) [signature]
२०. सत्यभामा संजय ठाकरे (अध्यक्ष) S. S. Thakre
२१. ललीता गणेश मुळे — ललीता मुळे
२२. अल्का चौधरी — अल्का चौधरी
२३. संगिता आगाशे — संगिता आगाशे
२४. सुषमा सातपैसे
२५. स्वाती कांबळे — Skamble
२६. प्रगती सोनकर — [signature]
२७. पार्वती भलावी — पार्वती
२८. मंदा तेरकर — मंदातेरकर
२९. सुरेखा कावळे पशुसखी — [signature]
३०.
३१.
३२.
३३.
३४.
३५.
३६.
३७.
३८.
३९.
४०.

## सभा क्र. ६

### सभेचे इतिवृत्त

१. सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सुनिता मेश्राम, सरपंच, टेकडी या उपस्थित होत्या तसेच मार्गदर्शन करण्यासाठी मा. संजय पाटिल, कोषाध्यक्ष भारतीय बौद्ध परिषद, चिचोली, प्रा. शशीकांत राऊत, मा. जाधव व मा. बोरकर, बचतगट अधिकारी, ता. पारशिवनी हे उपस्थित होते.

२. मा. संजय पाटिल यांनी महिलांना संबोधीत करतांना सांगीतले की, महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून वेगवेगळ्या उत्पादन क्षेत्राकडे वळले पाहिजे. आपल्या उत्पादनाच्या दर्जावर लक्ष देणे आवश्यक आहे. सरकारच्या विविध योजनांचा तुम्ही लाभ घेतला पाहिजे.

३. मा. बोरकर यांनी सभेतील महिलांना मार्गदर्शन केले की, तुम्ही केवळ लोणची, पापड बनविण्यापुरते मर्यादीत राहू नका. इतर अनेक वस्तू तयार करण्याच्या उद्योगाकडे वळा. त्यासाठी सरकारी स्तरावर आयोजित प्रशिक्षण वर्ग करा. सरकारच्या विविध योजनांचा लाभ घ्या.

४. मा. शशीकांत राऊत यांनी महिलांमध्ये मूळातच उद्योजकता हा गुण असतो. त्यामुळे महिला उत्तम उद्योजीका बनू शकता. तुम्ही बचत गटाच्या माध्यमातून उत्पादन क्षेत्राकडे वळण्यासाठी आधी प्रशिक्षण घ्या. त्याव्यतिरिक्त इतर काही मदत लागली उदा. बाजारा विषयी तर आम्हाला सांगा. तसेच अन्य काही उपक्रमाबद्दल शशीकांत राऊत यांनी सभेला / महिलांना माहिती दिली.

५. सभेचे प्रास्ताविक डॉ. प्रज्ञा बागडे यांनी केले. अध्यक्षीय भाषण श्रीमती सुनिता मेश्राम यांनी केले, त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महिला बचत गटाच्या महिलांनी आपल्या उत्पादनाच्या दर्जावर लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगीतले

## सभा क्र. ६

आज दिनांक १५/०२/२०२१ ला महाविद्यालयातील 'Incubation Centre' 'महिला सेल' व 'उत्कर्ष' यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचत गटांना भेट देवून मार्गदर्शन करण्यासंदर्भात सभेचे आयोजन करण्यात आले. सभेला खालील प्राध्यापक व महिला बचत गट संचालिका उपस्थित होत्या (श्रीमती संगीता चव्हाण)

१. डॉ. प्रज्ञा बागडे (समन्वयक) – Pradnya
२. डॉ. मनिषा नागपुरे – Mapure
३. डॉ. कल्पना भजनी – Kalpana
४. डॉ. कल्पना मंडलेकर – Mandlekar
५. डॉ. विमल राठोड – Rathod
६. डॉ. सुदेश भोवते
७. डॉ. सुशांत चिमणकर –
८. डॉ. अमृता डोरलीकर – A.I. Dorlikar
९. प्रा. प्रणोती सहारे
१०. श्रीमती संगीता चव्हाण (बचतगट संचालिका) – Chavan

## सभेचे विषय

१. वर्धा येथील बचतगटांना भेटी देणे व मार्गदर्शन करणे, यासंबंधी चर्चा करणे

२. प्राचार्यांची परवानगी घेणे व सभेविषयी माहिती देणे

## सभेचे इतिवृत्त

१. वर्धा येथील लेदर बॅग बनविणाऱ्या, सेवई, पापड व वड्या बनविणाऱ्या बचत गयला भेट देणे व मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक १८/२/२०२१ हे

२. महिला बचत गटांच्या उत्पादित मालाला बाजारपेठ नाही असा विषय श्रीमती संगीता चव्हाण यांनी सभेपुढे ठेवला असता त्यावर चर्चा होऊन आपण आपल्या सेंटर कडून काय करु शकतो? अशी चर्चा करण्यात आली त्यात असे ठरले की, विविध ठिकाणी जे मेळावे आयोजित करण्यात येतात, त्याबाबतची माहिती नागपूर जिल्ह्यातील विविध महिला बचत गटांना देण्यात यावी. त्यासाठी त्यांचा एक What's App Group तयार करावा. असेही ठरले.

३. ज्या प्राध्यापकांना शक्य होईल त्यांनी दिनांक १८/०२/२०२१ ला सकाळी १०.३० वाजता तयार राहावे व तशी प्राचार्यांकडून परवानगी घ्यावी.

४. श्रीमती संगीता चव्हाण ह्या महिला बचत गटांना सभेची सूचना देतील व वर्धा येथील सभा आयोजित करतील असे सर्वानुमते ठरले.

डॉ. प्रज्ञा बागडे
समन्वयक

# सभा क्र. ८

आज दिनांक १८/०२/२०२१ ला दुपारी १.०० वाजता वर्धा येथील लेदर बॅग तयार करणाऱ्या 'आधार स्वयं सहायता बचत गटाला' भेट देण्यात आली व मार्गदर्शन करण्यात आले. या भेटीत खालील प्राध्यापक व बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या

१. डॉ. प्रज्ञा बागडे (समन्वयक) Pradnya
२. डॉ. कल्पना भजनी Kalpana
३. डॉ. कल्पना मंडलेकर Mandlekar
४. श्रीमती संगीता चव्हान Chawan
५. श्रीमती वंदना रविराज मानकर वंदना मानकर
६. श्रीमती मनिषा संघपाल वाघमारे Manisha
७. सुजाता किशोर फुसाटे Sujata
८. जया गौतम गणवीर जया गणवीर
९. वनीता रामदास हिवरकर वनीता हिवरकर
१०. वनीता सुभाष देवपारे Vanita Deopare
११. लिला चोखोबा पाटिल लिला पाटिल
१२. सोनु सिद्दार्थ फुसाटे Sonu
१३. लक्ष्मी निकेश शेंदरे ल. शेंदरे
१४. शितल सागर बाभळे Shital
१५. जोत्सना विनोद रंगारी J. Rangari
१६. सीमा विशाल रामटेके Sumtake
१७. सारीका विराज रामटेके Sarika
१८. ममता प्रकाश आगलावे mamta Aglave

आधार बचत गटाच्या वरील महिला उपस्थित होत्या. ह्या महिला लेदर बॅग च्या शिलाईच्या उद्योग करीत आहेत. त्यांनी तयार केलेल्या विविध बॅग्स ची पाहणी करण्यात आली. त्यांना आणखी फिनीशींग ची गरज असल्याचे डॉ. कल्पना भजनी व डॉ. प्रज्ञा बागडे

नागपूर मधील दुकानदारांशी संपर्क करून आपल्याला बाजार कसा उपलब्ध होईल याबाबत आम्ही मदत करू शकतो. विविध मेळाव्यांमध्ये तुम्ही आपल्या बचत गटाचा स्टॉल लावू शकता. तसेच नागपूरात होणाऱ्या मेळाव्यांची माहिती त्यांनी पुरविली जाईल असे बचतगट संचालीका श्रीमती संगीता चव्हाण यांनी सांगितले.

डॉ. प्रज्ञा बागडे
समन्वयक

# सभा क्र. ९

आज दिनांक १८/०२/२०२१ ला दुपारी २.०० वाजता महाविद्यालयातील 'Incubation Centre' 'महिला सेल' व 'उत्कर्षा' अंतर्गत 'लक्ष्मी स्वयं सहायता समुहाला' भेट देण्यात आली. भेटी दरम्यान खालील प्राध्यापक व बचतगटाच्या महिला उपस्थित होत्या.

१. डॉ. प्रज्ञा बागडे (समन्वयक) Badge
२. डॉ. कल्पना मंडलेकर (सदस्य, उत्कर्षा) Kalpana
३. डॉ. कल्पना भजनी (सदस्य, उत्कर्षा) Mandlekar
४. श्रीमती संगीता चव्हाण (संचालीका, बचतगट) Chavan
५. श्रीमती निर्मला विजय कुंभरे Nirmala
६. अनुसया अंकुश परचाके A. Parchake
७. शालु सुकुराम कुंभरे शालु कुंभरे
८. सुनंदा शालीक कुंभरे S. Kumre
९. मालती दुर्योधन कुंभरे मालती कुंभरे
१०. हिराबाई दयाल भगत हिराबाई भगत
११. गंगाबाई चंद्रभान ठेलकर गंगाबाई
१२. शशीकला नामदेव पुराम S. Puram
१३. माधुरी सचीन कुंभरे Madhuri
१४. पंचफुला मारोती चापरे पंचफुला चापरे

वर्धा येथील लक्ष्मी स्वयं सहायता समुहाला दिनांक १८/०२/२०२१ ला दुपारी २.०० वाजता भेट देण्यात आली. हा गट वड्या, पापड, शेवया तयार करतो. वड्या, पापड, शेवया तयार करतांना त्यांना कोणत्या अडचणी येतात असे विचारले असता त्यांनी सांगितले वर्षभर ह्या उद्योगाला काम मिळत नाही. पावसाळ्यात काम नसते. हिवाळ्यातही कमीच काम असते परंतु उन्हाळ्यात मात्र भरपूर काम असते असे सांगण्यात आले.

श्रीमती संगीता चव्हाण यांनी महिलांना

शकतो. तुम्ही Quality माल तयार केलात तर तुम्हाला शहरातीलही दुकान, मॉलमध्ये माल पुरवीता येईल.

बचतगटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची Quality चांगली वाटली. सर्व महिलांचे अभिनंदन करण्यात आले व सभा संपली.

डॉ. प्रज्ञा बागडे
समन्वयक